<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.६</u>

**<u>सं.फौ.ख.क्र.१६१/२०२१</u>**
**सरकार विरूध्द आकाश**
**निशाणी – २१**

**मी शपथपूर्वक खरे सांगतो की**

**माझे नाव – अतुल मधुकरजी वाघमारे**
**वय – अंदाजे २८ वर्ष, व्यवसाय – भाजीपाला विक्री**
**राहणार – रामटेक**

**सरतपास सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती नंदेश्वर यांच्या कडून**

मी आकाश देशमुख ला ओळखतो, त्याचे दुकान माझ्या दुकानाच्या बाजुला आहे. तसेच मी कुणाल देशमुख याला ओळखतो, तो आकाश देशमुख च्या दुकानात काम करत होता. घटना दि.२३.०५.२०२० रोजी डुमरी स्टेशन चौकात पहाटे ०५.०० वाजताच्या दरम्यान घडली होती. मी, आकाश व कुणाल रामटेक हून नागपूर कडे MH–40–BL–6498 या ४०७ या चारचाकी गाडीने निघालो होतो. त्यावेळी आकाश देशमुख गाडी चालवित होता. परत येताना हायवे रस्ता बंद असल्याने व रस्त्याचे काम चालू असल्याचे त्याला समजले नाही. तसेच त्याला बाजुचा रस्ता समजला नाही, त्याने ब्रेक न मारता वळन घेतले त्यामुळे गाडी पलटी झाली, त्यावेळी लोक जमा झाले, त्यांनी मला पहिल्यांदा बाहेर काढले, त्यानंतर कुणाल ला काढले, त्यानंतर तिथल्या लोकांनी जेसीबी आणली व आकाश देशमुखला गाडीतुन बाहेर काढले. त्यावेळी तो गाडी चालवित होता. त्यानंतर आम्ही ॲम्ब्युलन्स मधून कन्हान दवाखान्यात गेलो. कुणालच्या दोन्ही पायाला मार लागल्याने त्याला पहिले पाठविण्यात आले होते. त्यानंतर आम्ही कन्हान दवाखान्यात गेलो. त्यानंतर कन्हान दवाखान्यातून आम्हा तिघांनाही तिथल्या ॲम्ब्युलन्स मध्ये बसवून मेडीकल दवाखान्यात पाठविले. मला पायाला व कमरेला मार लागला होता. कुणाल देशमुख मेडीकलच्या दवाखान्याच्या गेट जवळ आम्ही पोहोचलो त्यावेळी मरण पावला. अपघात आकाश ला रस्ता न दिसल्याने व गाडी कंट्रोल न झाल्याने गाडी पलटी होउन झाला. पोलिसांनी माझा बयान नोंदविला होता. मी आकाश ला पाहिल्यास ओळखू शकतो. तो आज न्यायालयात हजर नाही.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. बागडे यांच्या मार्फत सुरू**

पोलिसांनी मला बयान वाचून दाखविला होता. हे म्हणणे खरे आहे की त्यावेळी रामटेक हून नागपुर कडे येण्यासाठी एक रस्ता बंद होता व एकाच रस्त्याने दोन्ही बाजुची वाहतूक चालू होती. हे म्हणणे खरे आहे की आमची गाडी रस्त्याच्या आम्ही जात असलेल्या दिशेने जात होती. मी पुन्हा सांगतो की दोन्ही बाजुची रस्ता बंद असल्याने एकाच रस्त्याने दोन्ही वाहतूक सुरू होती. हे म्हणणे खरे नाही की आरोपी च्या ताब्यातील गाडी तासी ५० ते ६० किमी या वेगाने

चालत होती. साक्षीदार सांगतो की गाडी कमी वेगात असती तर गाडी कंट्रोल झाली असती. हे म्हणणे खरे आहे की आकाशची या अपघातात चुकी नाही.

**उलटतपास संपला.**

**फेरतपासणी नाही.**

वा.दा.ब.अ.क.के.
समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT

Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2026.07.18 16:29:02 +0530

कामठी
दिनांक १८/०७/२०२६

(मोहन रा. कामत)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्या.क्र. १, कामठी